अतुल देशपांडे



त. माण
नेल्या पावसाने
लसंधारणाच्या

लागवड

डीचे मोठे काम उभे
न, लोकसहभागातून
या कामांची पाहणी
संचालक मंडळाने
थांच्या या विधायक
ले.

र्ज

ना'

# 'नवी आव्हाने पेलण्याची तयारी'

8/7/2015 मटा



**मुलींना दर्जेदार शिक्षण आणि सुरक्षित वातावरण मिळावे यासाठी डॉ. व्ही. टी. पाटील यांनी स्थापन केलेल्या ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेजमध्ये हजारो विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. या कॉलेजचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्याशी अनुराधा कदम यांनी साधलेला संवाद.**

**मुलींच्या शिक्षणासाठी उपयुक्त अभ्यासक्रम कोणते आहेत?**

मुलींना दर्जेदार शिक्षण आणि सुरक्षित वातावरण मिळावे याच हेतूने ताराराणी विद्यापीठाची स्थापना करण्यात आली आहे. गृहशास्त्र, ब्युटी कल्चर, बी. व्होक, हेल्थ डाएट, ड्रेस डिझाइन, फूड प्रिझर्व्हेशन, ज्वेलरी मेकिंग यासारख्या अभ्यासक्रमांची सुविधा कमला कॉलेजमध्ये उपलब्ध करून देण्यामागचा हाच उद्देश आहे की मुलींना केवळ शिक्षणच नव्हे तर त्यामध्ये करिअरचा मार्गही सोपा होईल. तसेच विवाहितांनाही या प्रकारचे छोट कोर्सेस करता यावे आणि त्यातून रोजगाराची संधी तसेच उद्यो जिका घडाव्यात यादृष्टीने कॉलेज व्यवस्थापन प्रयत्नशील असते.

**तंत्रज्ञानाशी कॉलेजने कशी नाळ जोडली आहे?**

नॅकतर्फे कॉलेजला बी प्लस दर्जा मिळाला आहे. कमला कॉलेजमध्ये सध्याच्या काळातील सर्व तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. बीसीए अभ्यासक्रमाची सोय उपलब्ध आहेच. शिवाय कॉलेजमधील प्रत्येक विभागातर्फे घेण्यात येणारे सेमिनार, कार्यशाळा, प्रोजेक्ट सादरीकरण तंत्रज्ञानाचा वापर करून मुलींनी करावे यासाठी विशेष प्रोत्साहन व मार्गदर्शन केले जाते. कॉमर्स विभाग, शास्त्र शाखेसह गृहविज्ञान, योगा, बी. व्होक या विभागामध्ये नव्या माध्यमांचा वापर करता यावा यासाठी लॅब, प्रोजेक्टर रूम यांची सोय करण्यात आली आहे. सुसज्ज ग्रंथालय, होमसायन्स, बीसीए यासाठी आवश्यक असलेल्या प्रयोगशाळा यामध्येही तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर देण्यात आला आहे.

**करिअरला वाव देण्यासाठी कॉलेज काय उपक्रम राबवते?**

टॉकटाइम

निश्चितच आजचे शिक्षण करिअरशी निगडीत आहे. त्यामुळे कमला कॉलेजमधून बाहेर पडणारी प्रत्येक विद्यार्थिनी ही स्वावलंबी झाली पाहिजे हा दृष्टिकोन सतत जागृत असतो. त्यासाठी हॉस्पिटॅलिटी अॅडमिन, कम्युनिकेश स्किल इन इंग्लिश, संशोधन कार्यशाळा यांसारखे विशेष अवांतर उपक्रम सुरू आहेत. बी. व्होक हा नवा अभ्यासक्रम गेल्या वर्षीपासून सुरू झाला असून, पहिल्याच वर्षानंतर मुलींना नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. कमला कॉलेजमध्ये जे अभ्यासक्रम शिकवले जातात त्याद्वारे नोकरी आणि व्यवसाय या दोन्ही क्षेत्रात मुलींना करिअर करण्यासाठी मार्गदर्शन केले जाते. तसेच स्पर्धा परीक्षा, मुक्त विद्यापीठाचे कोर्सेस, विविध शैक्षणिक संस्थांशी असलेले टायअप यामुळे मुलींना खूप दिशा मिळतात.

**भविष्यात कोणते अभ्यासक्रम सुरू होणार आहेत?**

बीए, बीकॉम बीएस्सी या पारंपरिक शाखांसोबत सध्या अनेक वेगळ्या धर्तीवरचे अभ्यासक्रम सुरू आहेत. ज्यामध्ये एमएम होम सायन्स आणि एमए मराठी या शाखा मुलींच्या शिक्षणासाठी उपयुक्त आहेतच. भविष्यात एमबीए एमसीए हे विभाग सुरू करण्यात येणार आहेत. मुलींच्या बाबतीत असे होते की त्या पदवीपर्यंत शिकतात, मात्र पदव्युत्तर शिक्षणाची सोय नसेल तर त्यांचे शिक्षण थांबते. याचा विचार करून होमसायन्सचा पदव्युत्तर विभाग सुरू करण्यात आला होता. याचेच पुढचे पाऊल टाकत आयसीटी सुविधांच्या माध्यमातून इंटरनॅशनल वर्कशॉप, कॉमर्स लॅब आणि करियर ओरिएंटेड कोर्सची रचना करण्यात येणार आहे. संशोधन क्षेत्रात ग्रामीण भागातील तसेच सर्वसामान्य कुटुंबातील मुलींचा सहभाग वाढावा यादृष्टीने विशेष रिसर्च अॅक्टीव्हीटी सुरू होणार आहे.

**अवांतर उपक्रमांवर भर देता का?**

शिक्षणासोबत व्यक्तिमत्त्व विकासही आयुष्यातील प्रगतीसाठी महत्त्वाचा असतो. याच जाणिवेतून कमला कॉलेजमध्ये सातत्याने विविध स्पर्धा, चर्चासत्रे, कार्यशाळा, व्याख्याने यांचे आयोजन केले जाते. करिअर गाइडन्स, कॅम्पस इंटरव्ह्यू अशा उपक्रमांबरोबरच विविध कलागुण विकासमंचतर्फे मुलींना वाव दिला जातो. कॉलेजमध्ये राष्ट्रीय सेवायोजना, एनसीसी, नेचर क्लब ही व्यासपीठे आहेत. टीचर्स पॅरेंट भेट या उपक्रमातून मुलींच्या आवडीनिवडी जाणून घेतल्या जातात, ज्यायोगे मुलींना विविध स्पर्धांसाठी मार्गदर्शन करता येईल. अॅडव्हेंचर कॅंप, सकस आहार मेळावा, स्नेहसंमेलन, योगा हेल्थ कमिटी अशा उपक्रमातून मुलींना माहिती, मनोरंजन आणि त्यांच्या कलागुणांना वाव देणारे उपक्रम राबवले जातात.